# महाराष्ट्र विधानसभाम

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६**

## मृद व जलसंधारण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडएच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०२, मृद व जलसंधारण**<br>**रूपये:- ८,०२,८३,४७,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (१) | १३४६ | १० | वाशिम जिल्हयातील रिसोड व मालेगांव तालुक्यात असलेल्या नदी व नाल्यांवर शेतकऱ्यांच्या सोईसाठी पुल कम बंधारे निर्माण करणे जेणेकरुन पाणीसाठा व शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्तादेखील उपलब्ध होईल, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (२) | १४५२ | १० | गडचिरोली जिल्हातील ता. कुरखेडा व कोरची या भागामध्ये गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम राबवून शेतजमिनीची उपयोगिता वाढविण्यासाठी मजगी, बोडी, यासारखे जलसंधारण प्रकल्प राबविण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | १४१० | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघामध्ये जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अनेक महत्त्वाच्या योजना प्रभावीपणे राबवल्या जात नाहीत. याबाबत आढावा घेतला असता संबंधित अधिकाऱ्यांनी मनुष्यबळाची कमतरता हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले आहे. उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमध्ये जलसंधारण विभागातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे दीर्घकाळापासून रिक्त आहेत. त्यामुळे जलसंधारणाची कामे, मृद व जलसंधारण प्रकल्प तसेच विविध विकास योजना वेळेवर राबविण्यात अडथळे निर्माण होत आहेत. या योजनांचा योग्य लाभ शेतकऱ्यांना मिळावा तसेच जलसंधारणाची कामे वेळेवर व प्रभावीपणे पूर्ण व्हावीत यासाठी संबंधित विभागात पुरेसे मनुष्यबळ असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमधील जलसंधारण विभागातील वरिष्ठ तसेच कनिष्ठ पदांवरील सर्व रिक्त पदे तातडीने भरून विभागाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडएच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०२, लहान पाटबंधारे**<br>**रूपये:- १,७५,७३,३८,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (४) | १४४१ | १०० | कोकणातील लघु पाटबंधारे आणि बंधारे गाळामुळे बुजल्याने शेतकऱ्यांचे होणारे नुकसान ही एक गंभीर समस्या आहे. गाळ साचल्यामुळे साठवण क्षमता कमी होते आणि पाण्याचा उपसा न झाल्याने आजूबाजूच्या जमिनी दलदलयुक्त किंवा क्षारपड होऊन नापीक बनत असणे या समस्येवर मात करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तातडीच्या तांत्रिक उपाययोजना करणे जसे की गाळ उपसा करणे, 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या योजनेअंतर्गत स्थानिक प्रशासनाकडून बंधाऱ्यातील गाळ काढणे आवश्यक असणे. हा सुपीक गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात मोफत वापरता येण्यास मदत होणे दुरुस्ती आणि देखभाल करणे सांडव्यांची (Waste Weir) दुरुस्ती आणि ढासळलेल्या भिंतींचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे, ज्यामुळे पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने करता येणे उपसा जलसिंचन योजनांचे पुनरुज्जीवन करणे बंद पडलेल्या उपसा योजनांच्या मोटारी आणि पाइपलाईनची दुरुस्ती करून त्या कार्यान्वित करणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ११ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) मृद व जलसंधारण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई